पुणे शहर पोलीस

# दर्पण

सप्टेंबर २०१९

# अभिप्राय...

'दर्पण' पुस्तकाबाबत..

मी पोना 6832 कुमार, नेमणूक हवेली पो.स्टे.

सध्या मी हवेली पो.स्टे. येथे डी.बी./ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्य करित आहे. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. डॉ. के. वेंकटेशम् सर यांनी पोलीस दलाची जनमानसात प्रतिमा उंचावण्यासाठी 'दर्पण' पुस्तकाची संकल्पना सुरु केली आहे. या दर्पण पुस्तकामध्ये पोलीस अधिकारी/व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामाचा गौरव फोटो सहित छापला गेला त्यामुळे समाजातील लोकांना पोलीस सुध्दा चांगले काम करतो आहे याची जाणीव होवू लागली आहे. त्यामुळे पोलीसांची प्रतिमा चांगली होण्यास मदत झाली आहे. दर्पण पुस्तकामध्ये पोलीसांचे कामाचा चांगल्या कामाचा गौरव केला जातो हे पाहून इतर पोलीस बांधव हे सुध्दा चांगले काम करण्याची इच्छा बाळगून चांगले काम करणे बद्दल धाडसी प्रयत्न करतात.

'दर्पण' पुस्तक खरोखरच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या गौरवाचेच पुस्तक आहे असे मला वाटते.

पोना 6832 कुमार पी.डी.
हवेली पो.स्टे. पुणे

## गुडवर्क व दर्पण या पुस्तका बाबत अभिप्राय

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामास (Good Work) वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्याचा व वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या कात्रणांपासून तयार केलेले दर्पण हे पुस्तक नागरिकांना पाहणेसाठी पोलीस स्टेशन स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. हा उपक्रम हा अत्यंत चांगला आहे.

या उपक्रमामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे दैनंदिन कर्तव्या दरम्यान स्वयंस्फुर्तीने चांगले काम करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. तसेच अशा केलेल्या चांगल्या कामाची माहिती ही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे व्हॉटस्ॲप ग्रुप्सवर प्रसिध्द होत असल्याने त्याबाबत इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शुभेच्छा देण्यात येतात त्यामुळे चांगले काम केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो तसेच इतरांना चांगले काम करण्याची व त्यास प्रसिध्दी देण्याची ईर्शा निर्माण होते.

तसेच दर्पण हे पुस्तक येरवडा पोलीस स्टेशन येथे येणारे नागरिक वाचतात व पोलीसांचे चांगले कामाबद्दल चर्चा करतात. तसेच पोलीसांचे कामाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण होत आहे. वर्तमान पत्रातील चांगल्या कामाचे प्रसिध्दी मुळे नागरिक समक्ष भेटून अभिनंदन व शुभेच्छा देतात. त्यामुळे एकप्रकारे चांगला अनुभव मिळतो व त्यातून अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. सदरचे उपक्रम हे अत्यंत चांगले असून ते यापुढेही कायमस्वरूपी चालू ठेवावेत.

( शुभांगी मगदुम )
महिला पोलीस उप निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

# उत्कृष्ट कार्य


उत्कृष्ट कार्य

hindustantimes – 16 August, 2019

# Ganeshotsav 2019: Good work by Pune police

Ganeshotsav 2019 will be memorable for smooth and timely conduct of the immersion processions and lower decibel levels as compared to the past. Ganesh mandals and police deserve kudos, but more needs to be done...

MONDAY MUSINGS



ABHAY VAIDYA

The Ganeshotsav celebrations that just passed by will be memorable on at least two counts: For the first time in a decade, the city's majestic Ganesh immersion procession that passes through Laxmi road and Tilak road closed in a record 23.45 hours.

The fact that it took less than 24 hours for this slow-moving procession on a four-and-a-half kilometre stretch to conclude is a commendable feat. In the past, this procession has taken anywhere between 26 to 29 hours and more to conclude.

The second reason why Ganeshotsav 2018 will be memorable, is noise pollution levels. Both, the Maharashtra Pollution Control Board (MPCB) and a team from College of Engineering Pune (COEP) have reported that noise levels this time were marginally lower-about 8-10 decibels than previous years.

Anecdotal feedback from residents in various parts of the city confirms that noise levels were much lower. Some irresponsible housing societies in localities such as Bopodi did have blaring DJ music on the 10th day, which was conveniently ignored by the Bopodi-Khadki police. However, by and large, noise levels were indeed on the lower side.

This was again, because of the firm stand taken by the Pune police against DJ music and the installation of 'speaker walls' by various Ganpati mandals.

Indeed, credit is due to Pune police commissioner K Venkatesham for the smooth and orderly conduct of Ganeshotsav this year. As is well-known, numerous meeting were held with Ganesh mandals in the city and they were urged to reform with the times.

The mandals were urged to cooperate with the police and the public and not create nuisance by blocking roads with giant mandaps, playing blaring, ear-splitting music and delaying the procession by hours together to register self-importance.

Multiple meetings had to be held to underscore these points, and indeed, these efforts by the police have borne fruit.

Noise pollution watchers noted that noise levels had not reduced significantly because of the high decibel sound from the dhol-tasha troupes. Progressive minds from the city, especially those from organisations such as the Jnana Prabhodini must pay attention to this in order to bring down decibels to optimum levels.

What is acceptable to the pollution control board is 75 decibels- the upper limit for noise in places with commercial activity and not 96 and 100 decibels-plus as was the case.

A third factor that needs to be addressed effectively is that of extortion. Popular festivals is the time when Ganeshotsav contributions are "demanded" by various registered and un-registered mandals from residents and traders in the area. Most people pay up meekly rather than face the wrath of these Ganesh mandal representatives in their neighbourhoods. But when things go out of hand and turn ugly, police complaints are filed and reported prominently by the media as happens every year.

Ganeshotsav is a very joyous occasion and even a small token contribution ought to be enough for a dignified celebration. No one needs to pay up in thousands to these mandals. Specific limits should be set for these contributions and an appropriate receipt issued.

Any demand beyond this ought to be viewed as extortion inviting prompt action from the police.

Ganesh mandals and the Pune police thus have a four-fold responsibility towards the people of Pune: Ensure that the Ganesh immersion procession concludes in an optimum time span; do not block prominent roads and by lanes of the city with giant mandaps, exercise strict control to prevent noise pollution and take stern measures to prevent extortion by Ganesh mandals.

A determined pursuit of these objectives will undoubtedly bring back the dignity of Ganeshotsav celebrations.

abhay.vaidya@hindustantimes.com



The Ganpati immersion procession of Dagdusheth Halwai Ganpati at Alka talkies chowk on Thursday. For the first time in a decade, the immersion procession closed in a record 23.45 hours. HT FILE

**A CONTINUING BLOT ON GANESHOTSAV IS THE EXTORTION IN THE NAME OF 'VOLUNTARY CONTRIBUTION'**

HT COVERAGE




HT had reported how the Ganeshotsav 2019 witnessed a 8-10 decibel decrease in the noise levels and that the immersion procession was completed in a record time frame due to the diligent efforts of the Pune police and other stakeholders.

प्रभात – दि. २९ सप्टेंबर, २०१९

# मौल्यवान वस्तू मिळाल्याचा आनंद

## पोलिसांकडून १० कोटी ६३ लाखांचा मुद्देमाल नागरिकांना परत



प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २८ - शहरातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल ९१ गुन्ह्यांत चोरी गेलेला मुद्देमाल जप्त करून नागरिकांना परत करण्यात आला. सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, मोबाइल यासह वाहने असा एकूण १ कोटी ५ लाख ६७ हजार रुपयांचा ऐवज पुनर्प्रदान करण्यात आला. चोरी गेलेला मुद्देमाल परत मिळाल्यामुळे नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले.

घरफोडी, सोनसाखळी चोरी अशा विविध गुन्ह्यांत चोरी गेलेला मुद्देमाल पुनर्प्रदान करण्याचा कार्यक्रम शुक्रवारी पोलीस आयुक्त कार्यालय येथे पार पडला. पोलीस आयुक्त के. वेंकटेशम यांच्या हस्ते नागरिकांना मुद्देमाल प्रदान करण्यात आला. यावेळी पोलीस सहआयुक्त रवींद्र शिसवे, अप्पर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग सुनील फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, अप्पर पोलीस आयुक्त (प्रशासन) संजय शिंदे आदींसह नागरिक यावेळी उपस्थित होते. नागरिकांना मुद्देमाल परत मिळाल्याने त्यांनी पोलिसांचे आभार मानले. दरम्यान, यापूर्वी ऑगस्ट २०१९ मध्ये ६९ गुन्ह्यातील १ कोटी १८ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल परत देण्यात आला होता. या वर्षभरात पुणे पोलिसांकडून एकूण १० कोटी ६३ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल परत करण्यात आला आहे.

# लुटमार करणाऱ्या दोघांना अटक

पुणे, दि. २८ - पुणे जिल्ह्यातील वेगवेगळ्या बँकांच्या बाहेर ग्राहकांच्या पैशांची लुटमार करणाऱ्या दोघांचा पाठलाग करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले. प्रसाद शामदास कुंचला ( वय ३०, रा बिटरगुंटा, तालूनेल्लूर, आंध्र प्रदेश) आणि श्रीनिवास एस सुकमनियन (वय ४५ , रा. वेलईपट्टी, लूमदुराई, तमिळनाडू) अशी त्यांची नावे आहेत. या दोघांनी रांजणगाव, इंदापूर, बारामती, सासवड, शिरूर, शिक्रापूर याठिकाणी जबरी चोरी, वाहनांच्या काचा फोडून मोटरसायकलची डिकी उचकटून रोख रकमेची चोरी केल्याचे ते सांगत आहेत. त्यांनी शुक्रवारी २९ सप्टेंबर रोजी रांजणगावमधील बँकेच्या परिसरामध्ये ग्राहकाला लुबाडले होते. हे दोघेही सराईत गुन्हेगार असून त्यांना यापूर्वीही पोलिसांनी अटक केली आहे.

पुढारी – दि. १९ सप्टेंबर, २०१९

# रिक्षात विसरलेली बॅग केली परत

**बिबवेवाडी : वार्ताहर**

रिक्षाचालकाने रिक्षात विसरलेली प्रवाशाची बॅग बिबवेवाडी पोलिस स्टेशनमध्ये आणून देत बॅग मूळ मालकाला परत केल्याचा प्रकार पुण्यात घडला. बिबवेवाडी पोलिसांनी रिक्षाचालक वाहिद सुतार यांच्या प्रामाणिकपणाचा सत्कार केला.

सोमवारी डॉ. अमित कांबळे (रा. तोडकर रेसिडेन्सी, बिबवेवाडी, पुणे) हे बिबवेवाडी ते शिवाजीनगर असा रिक्षाने प्रवास करीत असताना. त्यांचा पासपोर्ट व इतर महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग प्रवासादरम्यान रिक्षात विसरली. या घटनेची माहिती प्रवाशींच्या पत्नीने बिबवेवाडी पोलिस ठाण्यात दिली. या वेळी रिक्षाचालक वाहिद अनिस सुतार (रा. सिध्दी विनायक कॉलनी, शास्त्रीनगर, कोथरूड, पुणे) यांनी रिक्षात विसरलेली बॅग बिबवेवाडी पोलिसांना आणून दिली. बिबवेवाडी पोलिसांनी डॉ. अमित कांबळे व धनश्री कांबळे यांची रिक्षात विसरलेली बॅगेची ओळख पटवून रिक्षाचालकाच्या समक्ष परत केली. बॅग सुरक्षितपणे मिळाल्याबाबत कांबळे दाम्पत्यानी रिक्षाचालकाचे आभार मानले. या वेळी रिक्षाचालकाच्या प्रामाणिकपणाबद्दल बिबवेवाडी पोलिसांनी सत्कार केला.



रिक्षाचालकाचा गौरव करताना बिबवेवाडी पोलिस व इतर.

लोकसत्ता – दि. १५ सप्टेंबर, २०१९

# दामिनी पथकाचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** छावा स्वराज्य सेनेच्यावतीने पुणे पोलीस आयुक्तालयांतर्गत महिलांच्या रक्षणासाठी, तसेच सेवेसाठी स्थापन केलेल्या महिला दामिनी पथकातील महिलांच्या उत्तम कामगिरीची दखल घेऊन छावा स्वराज्य सेनेच्यावतीने त्यांना सन्मान पत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरवले.

पोलीस आयुक्तालयातील कार्यक्रमात पो. नि. विजया कारंडे, स. पो. नि. स्वाती केदारी, पो. उपनिरीक्षक प्रिया टिळेकर व ३७ रणरागिणींचे दामिनी पथक उपस्थित होते. गुन्ह्यांच्या घटना रोखण्यासाठी तयार केलेल्या विशेष प्रशिक्षित महिला पोलिसांचे दामिनी पथक वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्यात यशस्वी झाल्याचे पोलीस निरीक्षक विजया कारंडे यांनी सांगितले. छावा स्वराज्य सेनेचे संस्थापक अध्यक्ष राम घायतिडक (पाटील), प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पडवळ, प्रदेश कार्याध्यक्ष आरिफ शेख, पुणे शहराध्यक्षा मेघा कदम आणि पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सौरभ सगर, तसेच सेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. सेनेचे सांस्कृतिकचे प्रदेशाध्यक्ष जितेंद्र वाईकर यांनी सूत्रसंचालन केले.

# पुणे शहरात १०० ग्रीन कॉरिडॉर्सचा महत्त्वाचा टप्पा पार

## रुबी हॉल क्लिनिकचे बोमी भोट : नेहमी सहकार्य करण्याचे नागरिकांना आवाहन



। पुणे : प्रतिनिधी

ग्रीन कॉरिडॉरला लोकांकडून चांगले सहकार्य मिळत आहे. खऱ्या अर्थाने त्यांनी ही संकल्पना स्वीकारली आहे. पोलीस आणि एअरपोर्ट यंत्रणा यांची यामध्ये अमूल्य भूमिका असून त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे, असे रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी बोमी भोट यांनी सांगितले.

पुणे शहराने नुकताच १०० ग्रीन कॉरिडॉर्सचा महत्त्वाचा टप्पा पार केला. यात अनेक संस्था आणि यंत्रणांचा महत्त्वाचा वाटा असून, त्यांच्या कार्याचे कौतुक करण्याकरिता रुबी हॉल क्लिनिकने एक विशेष कार्यक्रम घेतला होता.

कमलनयन बजाज कॅन्सर केअर सेंटर येथील आरएस वाडिया सभागृहात आयोजित या कार्यक्रमात वाहतूक पोलीस, झेडटीसीसी, पुणे विमानतळ, पत्रकार संघ यांसारख्या महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या संस्थांमधील प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पुणे पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, माजी उपायुक्त ट्रॅफिक सारंग आव्हाड, पुणे विमानतळाचे सह कामकाज सरव्यवस्थापक संजय दुलारे, पुणे विमानतळ येथील असिस्टंट कमांडंट सीआयएसएफ जी. जी. भार्गव, झेडटीसीसीचे अध्यक्ष डॉ. एफ. एफ. वाडिया, झेडटीसीसीच्या समन्वयक आरती गोखले आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, रुबी हॉल क्लिनिकचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. परवेझ ग्रांट, रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी बोमी भोट, मुख्य कामकाज अधिकारी डॉ. किशोर पुजारी, वैद्यकीय सेवा संचालक डॉ. संजय पठारे, वरिष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. आर. बी. गुलाटी व डॉ. जगदीश हिरेमठ आदी उपस्थित होते.

या वेळी डॉ. संजय पठारे यांनी सध्याच्या प्रत्यारोपणाच्या स्थितीबाबत सादरीकरण केले, तर डॉ. किशोर पुजारी यांनी आभार मानले.

TIMES OF INDIA - 30 September, 2019

# Two caught with tiger skin worth ₹40L in intn'l market

Times News Network

**Pune:** The crime branch of the Pune police arrested two men from Aurangabad and recovered a tiger's skin worth Rs 5 lakh from them on Nehru Road on Saturday evening.

A team headed by senior inspector Arun Waykar arrested the two men identified as Rameshwar Harishchandra Deshmukh (35) and Vijay Ganpat Jagtap (38). A case against both has been filed with the Samarth police station under the provisions of Wild Life (Protection) Act.

According to the police, the duo came to city on a motorcycle with the skin which commands a price of Rs40 lakh in the international market. Acting on a tip-off, the police team set a trap to nab them on Nehru Road. The police had informed the forest department.



Officers from the crime branch with the tiger's skin seized from the two men following their arrest on Saturday

Police said both are farmers in Aurangabad. They do not have any previous criminal record.

During interrogation, the two men told the police that a 'guruji' had given them the hide about six years ago after they took care of him. The two were in need of money and someone in Aurangabad had informed them that they should go to Pune for customers.

Forest officials inspected the hide and said it was an original. Police now have launched a hunt for the "guruji" to ascertain how he possessed the tiger skin.

पुढारी – दि. १५ सप्टेंबर, २०१९

# मिरवणुकीत डल्ला; पाच टोळ्या जेरबंद

पुणे : प्रतिनिधी

गणेश विसर्जन मिरवणुकीतील गर्दीचा फायदा घेत भाविकांचे मोबाईल, सोनसाखळी आणि पाकिटांवर डल्ला मारणाऱ्या पाच टोळ्यांना फरासखाना पोलिसांनी जेरबंद केले. खास विसर्जन मिरवणुकीत चोऱ्या करण्यासाठी या टोळ्या बाहेरच्या राज्यांतून पुण्यात आल्याची माहिती पोलिस तपासातून समोर आली. या वेळी १४ आरोपींना पकडून ७ लाख ६२ हजारांचे ६० मोबाईल हस्तगत केले आहेत. त्यामध्ये ॲपल कंपनीच्या महागड्या मोबाईलचादेखील समावेश आहे.

यातील हरियाणातील महिलांच्या एका टोळीला फरासखाना पोलिसांनी जेरबंद केले असून, वर्धा व मुंबई येथील मोबाईल चोरांच्या चार टोळ्याही पकडल्या आहेत. दरम्यान गुन्हे शाखेने शुक्रवारी मालेगाव येथील १९ जणांच्या टोळीला अटक करून ८२ मोबाईल हस्तगत केले होते.

फरासखाना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजवरून बेलबाग चौकात संशयितरीत्या फिरणाऱ्या सहा महिलांच्या एका टोळीला ताब्यात घेतले. त्या मूळच्या हरियाणा येथील असून, दिल्लीतून ट्रेनने विसर्जनाच्या आदल्या दिवशी पुण्यात दाखल झाल्या होत्या. त्या सोनसाखळी चोरण्यासाठी आल्या होत्या. या

- मोबाईल, सोनसाखळी, खिशातील पाकिटे चोरण्यात सराईत
- १४ आरोपींकडून ७ लाख ६२ हजार रुपयांचे ६० मोबाईल जप्त
- शहरातील लॉजवर टोळीचे एक महिना अगोदर वास्तव्य

सर्वजणी बहीण, भावजय अशा एकाच नात्याच्या गोतावळ्यातील आहेत. त्यांच्याकडे अधिक तपास केला, तेव्हा त्यांनी फरासखाना पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या ५९ हजारांच्या सोनसाखळी चोरीची त्यांनी कबुली दिली.

ही कारवाई अपर पोलिस आयुक्त श्रीकांत तरवडे, पोलिस उपायुक्त स्वप्ना गोरे, सहायक पोलिस आयुक्त प्रदीप आफळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक जगन्नाथ कळसकर, पोलिस निरीक्षक नंदकिशोर शेळके, पोलिस उपनिरीक्षक यशपाल सूर्यवंशी, पोलिस कर्मचारी बापू खुटवड, सयाजी चव्हाण, केदार आढाव, अमर शिंदे, विशाल चौगुले, दिनेश भांदुर्गे, सचिन कुटे, सचिन सरपाले, मोहन



अटक आरोपींसह पोलिसांचे पथक.

## एक महिना अगोदर काही प्रमुख ठिकाणांची पाहणी

अटक करण्यात आलेल्या काही टोळ्या विसर्जनाच्या एक दिवस अगोदरच शहरात दाखल झाल्या; त्यामुळे त्यांनी विसर्जन मार्गावरील काही ठिकाणांची पाहणी केल्याचादेखील अंदाज आहे. बहुधा त्यांना कोणत्या ठिकाणी मोठी गर्दी होते, याची माहिती असावी. यापैकी एक टोळी लॉजवर वास्तव्यास होती. विसर्जनादरम्यान फरासखाना पोलिस ठाण्यात मोबाईल, पाकीट आणि सोनसाखळी चोरीच्या ४१ तक्रारी दाखल झाल्या आहेत. तसेच एक महिला हरवल्याचीही तक्रार दाखल आहे.

दळवी, आकाश वाल्मीकी, अमेय रसाळ, मयूर भोकरे, पंकज देशमुख, राजू देवकर, अनिल गायकवाड यांच्या पथकाने केली.

**मोबाईल चोरीप्रकरणी एकास अटक**

गणेशोत्सव कालावधीत सिंहगड परिसरात मोबाईल चोरणाऱ्यास गुन्हे शाखेच्या युनिट एकने अटक केली. त्याच्याकडून एक मोबाईल जप्त केला आहे. विनोद बबन कासुर्डे (३२, रा. ता. दौंड) असे अटक केलेल्याचे नाव आहे. गणेशोत्सवात गर्दीचा फायदा घेऊन भाविकांचे मोबाईल चोरणाऱ्या टोळ्या सक्रिय झालेल्या असतात. शेकडो मोबाईल चोरीला जातात. याला आळा घालण्यासाठी यंदा गुन्हे शाखेला सूचना देण्यात आल्या होत्या. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार कासुर्डेला पकडण्यात आले. त्याच्याकडे अधिक तपास केला जात आहे.

> गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये चोऱ्या करण्यासाठी खास आंध्र, कर्नाटक, हरियाणासारख्या राज्यांतून चोरांच्या टोळ्या शहरात दाखल होतात. तसेच राज्यातील इतर जिल्ह्यांतूनही चोरांच्या टोळ्या दाखल होतात. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अगोदर प्रतिबंधात्मक उपाययोजना करत सीसीटीव्ही तसेच पोलिसांची पथके तयार करून गुन्हेगारांवर लक्ष ठेवले होते. त्या आधारे हरियाणा येथील एका महिलेच्या टोळीला सोनसाखळीप्रकरणी जेरबंद करण्यात आले. तसेच मोबाईल, पाकीटमारी करणाऱ्या चार टोळ्यांनाही अटक केली. या टोळ्या मुंबई आणि वर्धा येथून आल्या होत्या. त्यांच्याकडून ६० मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत.
>
> **-जगन्नाथ कळसकर,** वरिष्ठ निरीक्षक, फरासखाना पोलिस ठाणे

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- आर.के.गोसावी, पोलीस हवालदार ५३८८, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडाभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अमंलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी उपलब्ध झालेली असुन दर्पन पुस्तक वाचल्यानंतर नागरिक हे पोलीसांचे चांगल्या कामाचे कौतुक करत आहे. नागरिकांच्या मनामध्ये पोलीसांविषयी चांगल्या प्रकारची भावना निर्माण होत आहे. तसेच पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचेही मनोबल वाढलेले असुन ते ही चांगली कामगिरी करुन आपले नाव व फोटो वर्तमान पत्रामध्ये येवुन त्याचे कात्रण दर्पण पुस्तकामध्ये समाविष्ट होणेसाठी चांगली कामगिरी करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( आर.के.गोसावी )
पोलीस हवालदार ५३८८
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.

---

प्रति,

मा. पोलीस आयुक्त सो,
पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट :- के एस पलांडे पोलीस शिपाई ८५६४ चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय :- दर्पण पुस्तिकेच्या अभिप्रायाबाबत...

महोदय,

/- उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी चंदननगर पोलीस स्टेशन या ठिकाणी ०३ वर्षापासुन नियुक्तीस असुन सायबर विभागामध्ये काम करत आहे. मा.पोलीस आयुक्त सो यांनी दर्पण पुस्तीकेच्या माध्यमातुन पोलीसांनी केलेली कामे, गुन्हयाचा लावलेला शोध, जेष्ठ नागरिकांना केलेली मदत व गुन्हास प्रतिबंध होणेसाठी केलेल्या उपाययोजना तसेच सामान्य नागरीकांना येणा-या अडचणी कशा सोडवाव्या या सदंर्भात केलेले मार्गदर्शन केले आहे. तसेच पोलीसांनी केलेल्या कामचे प्रशिस्ती प्रत्रक दपर्ण या पुस्तीकेच्या माध्यमातुन समाजासमोर मांडले आहे. त्यामुळे पोलीस व सामान्या नागरीकामध्ये चांगले संबंध तयार होत आहेत. त्यामुळे दर्पण ही पुस्तीकेचे पोलीस स्टेशनला येणारे नागरीक खुप कौतुक करत आहेत.

दर्पण पुस्तीका पोलीसांनी केलेल्या कामाचा सन्मानाबाबत मा.पोलीस आयुक्त सो. यांचे खुप खुप अभिनंदन. माननियांना सादर

तरी सदर माहिती अवलोकन व आदेशार्थ सविनय सादर.

मा.सादर व्हावे
दि. १६/०५/२०१९

पोलीस शिपाई ८५६४
चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर


चुकलेला मुलगा विसावला आईच्या कुशीत
At junctions of Smart City, an 'intelligent' syste
to help manage Pune's many traffic problems
आयुक्तांकडून कॉन्स्टेबलला मिळाले 'सरप्राईज गिफ्ट'
गुन्हे शाखेने ८० लाखांचे हस्तिदंत पकडले
नदीत पडलेल्या मुलाचे पोलिसांनी वाचविले प्राण
तब्बल २२ वर्षे फरार असलेल्यास केले जे
स्थानबद्धतेतून सराइतांवर पोलिसांच
ss programmes during
व्हिडिओ कॉल सुरु ठेवून आत्महत्येचा प्रयत्न
क्तृत्वाने व्यक्तिमत्त्व होते समृद्ध
चोरांची टोळी अटके
८२ मोबाइल जप्त
तत्काळ मदतीला धावून पोलिसांनी वाचवले प्राण
द्धिवादाची जोपासना करा
जच्या नावाखाली चालणा
या व्यवसायाचा पर्दाफाश
नदीत उडी मारलेल्या तरुणाला वाचवले
तंबाखूजन्य पदार्थ
ाणणाऱ्यांवर कारवाई
गदान प्रेरणादायक : बापट
दागिनेचोर जेरबंद
ILLEGAL SAND TRANSPORTATION
Driver arrested for stealing trucks attached by revenue dept officials
डॉक्टरच्या वेशातील वाहनचोरास अटक
नावट वस्तू बनवणाऱ्या कंपनीचा पर्दाफाश
गुन्हेगार जेरबं
वाघाच्या कातड्याची तस्करी
e Branch busts inter
बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत
eize 452 choppers
wo days, arrest six
पिस्तुलाची हौस पडली महागात!
दौन दिवसांत ३७५ कोयते जप्त